RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ६१]        गुरुवार, ऑक्टोबर ३, २०१३/आश्विन ११, शके १९३५        [पृष्ठे ६, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक १२२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २०१३

### अधिसूचना

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक आरजीएन-२०१३/९९३/प्र.क्र. १७१/म-१.— नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) (यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ८९घ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाची कलमे ८९क व ८९ख यांमध्ये निर्देश केलेल्या दस्तऐवजांच्या सत्यप्रती आणि नोटिसा दाखल करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र दस्तऐवजांच्या सत्यप्रती आणि नोटिसा दाखल करणे नियम, २०१३ " असे संबोधण्यात येईल.

२. **व्याख्या.—**

(एक) या नियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, नोंदणी अधिनियम, १९०८ असा आहे ;

(ख) " नोटिसा दाखल करणे " याचा अर्थ, ई-फायलिंग मोड्युलद्वारे नोटिसा ऑनलाईन दाखल करणे असा आहे ;

(ग) " दस्तऐवज " याचा अर्थ, कलम ८९क मध्ये विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज असा आहे ;

(घ) " ई-फायलिंग मॉड्यूल " याचा अर्थ, या नियमाखाली नोटिसा व दस्तऐवजांच्या सत्यप्रती ऑनलाईन दाखल करण्यासाठी, नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयाने विकसित केलेले सॉफ्टवेअर मोड्यूल असा आहे ;

(ङ) " नमुना " याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेला नमुना असा आहे ;

(च) " दस्तऐवजांच्या सत्यप्रती दाखल करणे " याचा अर्थ, ई-फायलिंग मोड्यूलद्वारे ऑनलाईन ई-फायलिंगसह दस्तऐवजांच्या सत्यप्रती दाखल करणे असा आहे.

(छ) " नोटीस " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ८९ख खाली निर्दिष्ट केलेल्या हक्कलेख निक्षेपाद्वारे गहाणासंबंधीची सूचना देणारी नोटीस असा आहे.



Source- www.taxguru.in

(दोन) यामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) मध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. (अ) अधिनियमाच्या कलम ८९ख मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोटिसा संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात एकतर प्रत्यक्ष जाऊन किंवा ई-फायलिंग मोड्यूलद्वारे ; आणि

(ब) अधिनियमाच्या कलम ८९क मध्ये निर्देश केलेल्या दस्तऐवजांच्या सत्यप्रती ऑनलाईन पद्धतीने दाखल करण्यात येतील.

४. ऑनलाईन फायलिंगच्या प्रयोजनार्थ, या नियमांना जोडलेल्या प्रपत्रात दिलेल्या नमुन्यामध्ये नोटिसा तयार करण्यात येतील.

५. सत्यप्रती प्रत्यक्ष दाखल करण्याच्या प्रयोजनार्थ, उक्त अधिनियमाच्या कलम ८९क मध्ये निर्देश केलेल्या दस्तऐवजांच्या सत्यप्रती ह्या न्यायालयाने किंवा संबंधित कार्यालयाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तयार करण्यात येतील, त्यावर स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्या मोहोरबंद करण्यात येतील आणि दस्तऐवज ऑनलाईन दाखल करण्याच्या प्रयोजनार्थ असे दस्तऐवज स्कॅन करून आणि पीडीएफ/अे नमुन्यात किंवा राज्य शासनाने प्रशासकीय आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात जतन करण्यात येतील आणि न्यायालयाच्या किंवा संबंधित कार्यालयाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडून त्यावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्वाक्षरी करण्यात येईल.

६. दस्तऐवजांच्या सत्यप्रती आणि नोटिसा ऑनलाईन दाखल करण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र ई-नोंदणी आणि ई-फायलिंग नियम, २०१३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

७. दस्तऐवजांच्या सत्यप्रती आणि नोटिसा दाखल केल्यानंतर,—

(क) दुय्यम निबंधक, दस्तऐवजांच्या सत्यप्रती किंवा नोटिसा ह्या त्यांच्या कार्यालयातील अतिरिक्त नोदवही क्रमांक-१ मध्ये प्रत्यक्षपणे ठेवील किंवा कॉपी करून ठेवील ;

(ख) दस्तऐवजांच्या सत्यप्रती व नोटिसांना वर्षाअखेरीस संपण्याजोगे स्वतंत्र सलग अनुक्रमांक देण्यात येतील आणि या प्रयोजनार्थ कार्यालयात एक स्वतंत्र दैनिक नोंदवही ठेवण्यात येईल ;

(ग) दुय्यम निबंधक, अशा प्रकारे दाखल केलेल्या दस्तऐवजांच्या सत्यप्रती व नोटिसांच्या प्रत्येक प्रतीवर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करील :—

" दुय्यम निबंधक ........................ यांच्या कार्यालयात, दिनांक ........................ रोजी अतिरिक्त नोंदवही क्र. १ मध्ये फायलिंग क्रमांक .................. येथे दाखल केली."

(घ) दुय्यम निबंधक, या पृष्ठाकनावर स्वतःची स्वाक्षरी करील आणि मुद्रा लावील.

Source- www.taxguru.in

# अर्ज

(नियम ४ पहा)

## हक्कलेख निक्षेपाद्वारे गहाणासंबंधी सूचना देणारी नोटीस

मी/आम्ही खाली सही करणारे पक्षकार, सूचना देणाऱ्या या नोटिसीद्वारे व्यापक लोकहितांस्तव, अशी नोटीस देत आहे/आहोत की, यातील गहाणदाराकडून संमती दिलेल्या, देण्यासाठी कर्जाच्या प्रतिभूतीकरिता मालमत्तेचे हक्कलेखांचे निक्षेप करीत आहे/आहोत.

(१) **पक्षकाराचा तपशील—**

(अ) गहाणदार :

पत्ता :

टॅन (संस्थासाठी)/पॅन (व्यक्तींसाठी) :

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ई-मेल आयडी :

(अ) गहाणकार (एक किंवा अनेक) :

पत्ता :

पॅन :

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ई-मेल आयडी :

(२) **मालमत्तेचे/ची ठिकाण/ठिकाणे :** जिल्हा : तालुका : गाव :

(३) **मालमत्तेचा तपशील (मिळकत क्रमांक, क्षेत्र, गाळ्यांसह) :**

(४) **बँकेकडे जमा केलेल्या दस्तऐवजांची यादी :**

(५) **कर्जाची रक्कम :** (६) **व्याजाचा दर :**

(७) **गहाण ठेवल्याचा दिनांक :** (८) **नोटिशीचा दिनांक :**

| गहाणकराचे नाव | पक्षकाराचे छायाचित्र* | अंगठ्याचा ठसा* | स्वाक्षरी* |
|---|---|---|---|
| | | | |

*(कंपनी/संस्था इत्यादींच्या प्रकरणात छायाचित्र, अंगठ्याचा ठसा व स्वाक्षरी अधिकृत व्यक्तीच्या नावासह)

**माहिती पडताळली व बरोबर असल्याचे आढळली.**

**(गहाणदाराच्या अधिकृत व्यक्तींची स्वाक्षरी व मुद्रा)**

**प्रदानाचा तपशील**

मुद्रांक शुल्क रुपये .................. इतके भरण्यात आले ........................ दिनांक ............................

जर मुद्रांक शुल्क इतर एखाद्या विलेखाद्वारे भरण्यात आले असेल तर त्या विलेखाचा तपशील व मुद्रांक शुल्क.

दाखल करण्याचा आकार रुपये १००० ........................ प्रदान करण्यात आला, दिनांक .......................................

दस्तऐवज हाताळणी आकार रुपये ३०० ........................ प्रदान करण्यात आला, दिनांक .......................................

**(कार्यालयीन वापराकरिता)**

| दुय्यम निबंधकाच्या कार्यालयाचे नाव | सादर केल्याचा क्रमांक | सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |

अनुक्रमांक ........................... दिनांक ....../...../२०...... रोजी दाखल केले

दुय्यम निबंधकाची स्वाक्षरी आणि मुद्रा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश नार्वेकर,**
शासनाचे उप सचिव.



Source- www.taxguru.in

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 1st October 2013.

### *NOTIFICATION*

REGISTRATION ACT, 1908.

No. RGN. 2013/993/C.R. (171)/M-1.—In exercise of the powers conferred by section 89D of the Registration Act, 1908 (16 of 1908) (hereinafter referred to as "the said Act") and of all other powers enables in this behalf, the Government of Maharshtra hereby makes the following rules, for the filing of true copies of documents and notices referred in sections 89A and 89B of the said Act, namely :—

1. These rules may be called as the Maharashtra Filing of True Copies of Documents and Notices Rules, 2013.

2. *Definations.*—

(*I*) In these tules, unless there is anything repugnant in the subject or context,—

(*a*) " Act " means the Registration Act, 1908 ;

(*b*) " filing of notices " means onling filing of notices, through the e-filing module ;

(*c*) " documents " means the documents specified in section 89A ;

(*d*) " e-filing module " means a software module developed by the office of the Inspector General of Registration for online filing of notices and true copies of documents, under these rules ;

(*e*) " form " means the form appended to these rules ;

(*f*) " filing of true copies of documents " means filing of true copies of documents, including online filing through the e-filing module ;

(*g*) " notice " means notice of intimation of mortgage by way of deposit of title deed referred under section 89B of the Act ;

(*II*) The words and expressions used but not defined herein shall have the same meaning as are respectively assigned to them in the Act and in the Information Technology Act, 2000 (21 of 2000).

3. (*a*) The notices specified in section 89B of the Act shall be filed using e-filing module ; and

(*b*) The true copies of the documents referred to in section 89A of the Act shall be filed, either physically in the concerned Sub-Registrar office or online using e-filing module.

4. For the purpose of oline filing, the notices shall be prepared online, in the format given in the Form appended to these rules.

5. For the purpose of physical filing, the true copies of the documents referred to in section 89A of the said Act, shall be prepared, signed and sealed by the authorized officer of the Court or concerned office, and for the purpose of online filing such documents shall be scanned and saved in the pdf/A format or in the format specified by the State Government by an administrative order, from time to time, and electronically signed by the authorized officer of the Court or concerned office.

6. The procedure for online filing or the true copies of document and notices shall be the same as mentioned in the Maharashtra e-Registration and e-Filing Rules, 2013.

Source- www.taxguru.in

FORM

(*See* rule 4)

**Notice of Intimation regarding Mortgage by way of deposit of Title Deed**

I/We, the undersigned parties, is/are by this notice of intimation, giving notice to the public at large that, the mortgagor herein had deposited the title deeds of the property for the security of the loan given/agreed to be given by the mortgagee herein.

(1) **Party Details :**

(a) Mortgagee—

Address :

TAN (For Organizations)/PAN (For Individuals) :

Phone/Mobile No. : Email-Id :

(b) Mortgagor(s)—

Address :

PAN :

Phone/Mobile No. : Email-Id :

(2) **Property Location (s) :** Dist. : Tal. : Village :

(3) **Property details (with Attribute No. Area, Unit) :**

(4) **List of Documents deposited with Banks :**

(5) **Loan Amount :** (6) **Rate of Interest :**

(7) **Date of Mortgage :** (8) **Date of Notice :**

| Name of Mortgagor | Party Photo* | Thumb Impression* | Signature* |
|---|---|---|---|
| | | | |

*(In case of company/institute etc. the photo, T. I. and Signature of the authorised signatory with name)

**The information is verified and found correct :**

**(Sign. and Seal of the authorised person of Mortgagee)**

**Payment Details**

Stamp Duty of Rs. ........................... has been paid *vide* ................................., Dated :

If Stamp Duty is paid on another instrument, details of the instrument and Stamp Duty :

Filing charge of Rs. 1,000 has been paid *vide* .........................................., Dated :

Document handling charge of Rs. 300 has been paid *vide* .........................................., Dated :

(*For office use only*)

| Name of Sub Registrar Office | Submission No.* | Date of Submission* |
|---|---|---|
| | | |

Filed On serial Number ......................... on ................ day of .............................. 20......

Signature and Seal of Sub-Registrar.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH NARVEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

Source- www.taxguru.in

7. After filing of the true copies of the documents and notices,—

(*a*) the Sub-Registrar shall paste or copy, the true copies of the document and notices in the Additional Register No. 1 kept in his office ;

(*b*) the true copies of the documents and notices shall be given separate consecutive serial number terminable at the end of the year and a separate Day Book, shall be maintained in the office for these purposes ;

(*c*) the Sub-Registrar shall endorse on each true copy of the documents and notices so filed, as follows :—

"Filed at Filing No. ............ in the Additional Register No. 1 on the ............. day of 20.........in the office of the Sub-Registrar ............................... .".

(*d*) the Sub-Registrar shall put his signature ~~ansent~~ and seal under this endorsement.

Source- www.taxguru.in